पीएच.डी. संशोधन आराखडा

"रायगड जिल्ह्यातील आरोग्य केंद्र व मानवी आजार : एक भौगोलिक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

सामाजिक शास्त्रे शाखे अंतर्गत भूगोल विषयातील पीएच.डी.
(विद्यावाचस्पती) या पदवीकरिता सादर केल्या जाणाऱ्या
शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

प्रा.शिंदे अनिल निवृत्ती

डॉ.सी.डी. देशमुख कॉमर्स व

सौ.के.जी.ताम्हाणे कला महाविद्यालय,

रोहा ता.रोहा जि.रायगड

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.सदानंद हरीबा गोने

उज्वल ग्रामीण महाविद्यालय, घोणसी

ता.जळकोट जि.लातूर

संशोधन केंद्र

श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

मार्च २०१६

“रायगड जिल्ह्यातील आरोग्य केंद्र व मानवी आजार : एक भौगोलिक अभ्यास”

प्रस्तावना :

कोणत्याही देशाची प्रगती (विकास) हा त्या देशातील लोकांच्या आरोग्यावर अवलंबून असतो. नागरिकांचे आरोग्य सुदृढ व निकोप असेल तर त्या देशाची आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक प्रगती गतिमान असते.

म्हणूनच प्रत्येक देशातील शासनप्रणाली लोकांचे आरोग्य उंचावण्यासाठी सतत प्रयत्न करत असते. याच नियमानुसार भारतात स्वातंत्र्यानंतर भारत सरकारतर्फे १९५४ मध्ये आरोग्य योजना सुरू करून जनसामान्यांना उपचाराच्या बाबतीत दिलासा दिला. त्यामुळे आरोग्य व औषधोपचार या सेवा खाजगी क्षेत्राकडून सार्वजनिक क्षेत्राकडे आल्या. स्वातंत्र्यानंतर भारतात प्रत्येक पंचवार्षिक योजनेअंतर्गत आरोग्य सुविधांसाठी सतत विविध योजना अमलात आणून त्यासाठी आर्थिक निधीही उपलब्ध करून दिल्याचे स्पष्ट होते. प्रत्येक नागरिकास निरोगी आयुष्य जगण्याचा घटनात्मक अधिकार आहे. याविषयी भारतीय राज्यघटनेतही तरतुदी केलेल्या आहेत. भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. आजही भारतात नागरी लोकसंख्येपेक्षा ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे. ग्रामीण भागातील लोकांचे उत्पन्न कमी असल्यामुळे लोकांना खाजगी आरोग्य सेवेचा लाभ घेणे परवडत नाही. त्यामुळे ते आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. अशीच परिस्थिती रायगड जिल्ह्यातही आहे. शासकीय आरोग्य केंद्रे हे मध्यमवर्गीय, गरीब व दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना नेहमीच सक्षमपणे कमी दरात आरोग्य सेवा सर्वांना उपलब्ध करून देतात.

भारतातील महाराष्ट्र राज्य एक महत्त्वाचे राज्य असून महाराष्ट्राच्या पश्चिमेला कोकण किनारपट्टीत अरबी समुद्रालगत असणारा आजचा रायगड जिल्हा म्हणजेच पूर्वीचा कुलाबा होय. रायगड जिल्ह्याला लाभलेले भौगोलिक स्थान हे अतिशय महत्त्वाचे असून रायगड हा पूर्वेस सह्याद्री पर्वतरांग व पश्चिमेस अरबी समुद्राच्या दरम्यान वसलेला आहे. रायगड जिल्ह्याच्या पुर्वेला पुणे व सातारा जिल्हा, दक्षिणेस रत्नागिरी जिल्हा, उत्तरेस मुंबई व ठाणे

जिल्हा अशा प्रकारचे सापेक्ष स्थान लाभलेले असून निरपेक्ष स्थानाचा विचार करता रायगड जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १७°५१' ते १९°०८' उत्तर अक्षवृत्त तर रेखावृत्तीय विस्तार ७२°५१' ते १९°०८' उत्तर तर रेखावृत्तीय विस्तार ७२°५१' पूर्व ते ७३°४०' पूर्व रेखावृत्त असा आहे. रायगड जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७१४८ चौरस कि.मी. असून रायगड जिल्ह्यास २४० कि.मी. लांबीची किनारपट्टी लाभलेली आहे. तसेच किनारपट्टीवर उरणची खाडी, धरमतरची खाडी, रेवदंड्याची खाडी, बाणकोट खाडी, राजपुरीची खाडी अशा विविध खाड्या आढळून येतात. रायगड जिल्ह्याचे प्राकृतिकदृष्ट्या खालाटी व वलाटी असे दोन विभाग पडतात. यापैकी खालाटी विभागाची उंची कमी असून तो समुद्रालगत सपाट मैदानाच्या स्वरूपात आहे. तर वलाटी विभाग सह्याद्री पर्वतरांगेला अनुसरून विस्तारलेला असून तो अधिक उंचीचा आहे व अनियमित भुपृष्ठरचनेचा हा भाग आढळतो. रायगड जिल्ह्यास लाभलेल्या हवामानाचा विचार करता उष्ण दमट व सम हवामानाचा हा विभाग असून ऋतूपरत्वे या हवामानात थोडासा बदल होतो. येथील दैनिक व वार्षिक तापमान कक्षेत जास्त फरक आढळत नाही. रायगड जिल्ह्यातील वार्षिक पर्जन्याची सरासरी ही ३०० सेमी आढळते. रायगड जिल्ह्याला लाभलेले भौगोलिक स्थान, सापेक्ष स्थान यांचा परिणाम प्राथमिक आरोग्य केंद्रावर तसेच मानवी आरोग्यावरही झाला आहे.

रायगड जिल्ह्यात २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ही २६,३४,२०० इतकी असून लोकसंख्येची घनता ही दर चौ.कि.मी. सरासरी ३६८ एवढी आढळते. रायगड जिल्ह्यात सार्वजनिक व शासन सहाय्यित संस्थांमार्फत चालवलेली १८ रुग्णालये, ७ दवाखाने, प्राथमिक आरोग्य केंद्रे ५२ व उपकेंद्रे २८८ इतकी आहेत. तर २२६ डॉक्टर्स, ५७३ परिचारिका उपलब्ध असून १८८४ खाटांची सोय उपलब्ध आहे. २०१२-१३ साली जिल्ह्यात एकूण १५८६३ लोकांचा मृत्यू वेगवेगळ्या कारणांनी झालेले आढळतात. यात क्षयरोग, हृदयविकार, कर्करोग, बाळंतपणातील मृत्यू, जळणे, अपघात ही महत्त्वाची आहेत. रायगड जिल्ह्यातील आरोग्य केंद्रात कर्मचाऱ्यांची व डॉक्टरांची संख्या कमी असून दवाखान्यात विविध आजारांना आवश्यक असणाऱ्या अत्याधुनिक उपचार साहित्याची कमतरता आहे. तसेच आरोग्य केंद्रात उपचार घेणे

हे श्रीमंत व उच्चवर्गीयांच्या दृष्टीने कमीपणाचे मानले जाते. अशी मानसिकता समाजात निर्माण झालेली आहे.

बहुतांशी लोक आरोग्य केंद्रात उपचार न घेता खाजगी दवाखाने, रुग्णालये यांना प्राधान्य देतात. गरीब व मध्यमवर्गीय लोक शासनाच्या विविध योजनांचा शासकीय आरोग्य केंद्रात लाभ घेतात. रायगड जिल्ह्यातील आरोग्य केंद्राच्या संख्येचा तालुकानिहाय आढावा घेतल्यास असे लक्षात येते की, प्रत्येक वर्षी लोकसंख्या वाढत आहे. परंतु आरोग्य केंद्रे मात्र त्या प्रमाणात वाढत नाहीत. आरोग्य केंद्राची संख्या कमी असून विविध सेवा पुरवण्यात आरोग्य केंद्रे कमी पडतात. या आरोग्य केंद्राचा प्रभाव सभोवतालच्या प्रदेशावर जास्त आढळत नाही. यासाठी विविध कारणे जबाबदार असल्याचे स्पष्ट जाणवते.

अभ्यास क्षेत्र व विषय निवड :

रायगड जिल्ह्याचा उत्तर-दक्षिण विस्तार अधिक आहे. जिल्ह्याच्या उत्तर भागात मोठी शहरे व मुंबई महानगरीय क्षेत्राची जवळीकता आढळते तर दक्षिणेकडे मात्र मोठ्या नगरांचे प्रमाण कमी असून ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे. रायगड जिल्ह्यात औद्योगीकरण मोठ्या प्रमाणात झाले असून आर्थिक उत्पन्न कमी असणाऱ्या लोकांची संख्या व आदिवासी लोकांची संख्याही जास्त आहे. या सर्वांचा परिणाम म्हणून रायगड जिल्ह्यात आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक मागासलेपणा स्पष्ट जाणवतो. या सर्वांचा परिणाम येथील मानवी आरोग्यावर झालेला आहे. मानवी आरोग्याचा संबंध आरोग्य केंद्राशी येत असल्याने व आर्थिक दृष्टीने मागास वर्गास आरोग्य सुविधा पुरविणारे शासकीय आरोग्य केंद्रे महत्त्वाची भूमिका बजावतात. म्हणून आरोग्य केंद्रे व मानवी आजार यांचा अभ्यास करण्यासाठी “रायगड जिल्ह्यातील आरोग्य केंद्र व मानवी आजार यांचा भौगोलिक अभ्यास” हा विषय निवडला आहे.

संशोधनाचे महत्त्व :

प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व संशोधकाने पुढीलप्रमाणे मांडले आहे.

१) रायगड जिल्ह्यातील आरोग्य केंद्राची माहिती मिळवण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे आहे.

२) रायगड जिल्ह्यात उद्‌भवणाऱ्या आजारांची माहिती मिळविण्यासाठी सदरील संशोधन महत्त्वाचे ठरते.

३) आरोग्य केंद्रातील सोयी-सुविधांचा आढावा घेवून त्यातील उणिवा दूर करण्यासाठी हे संशोधन उपयुक्त आहे.

४) शासकीय पातळीवर व सार्वजनिक अथवा खाजगी पातळीवर आरोग्यविषयक धोरण ठरविताना हे संशोधन महत्त्वाचे ठरेल.

५) आरोग्यविषयक लोकसंख्येच्या गरजा व उपलब्ध सेवा यांचा अभ्यास करण्यासाठी सदर संशोधन महत्त्वाचे आहे.

६) रायगड जिल्ह्यातील आरोग्य केंद्राची व वैद्यकीय सुविधांची भिन्नता नाहीशी करण्यासाठी हे संशोधन उपयुक्त आहे.

७) आरोग्य अभ्यासक, लोकसंख्या अभ्यासक, वैद्यकीय अभ्यासक, सामाजिक संस्था व देणगीदार यांच्यासाठी हे संशोधन उपयुक्त आहे.

८) रायगड जिल्ह्यातील तालुकानिहाय आरोग्य केंद्राचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे ठरते.

९) रायगड जिल्ह्यातील विविध रोग, आरोग्य केंद्रे, आरोग्यविषयक शासकीय योजना, आरोग्यविषयक ध्येय धोरणे यांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी हे संशोधन उपयुक्त आहे.

अभ्यासाची उद्दिष्ट्ये :

१) रायगड जिल्ह्यातील मानवी आरोग्यावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

२) आरोग्य केंद्राचे तालुकानिहाय वितरण अभ्यासणे.

३) आरोग्य केंद्रातील बदलांचा अभ्यास करणे.

४) आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या पदसंख्येचा अभ्यास करणे.

५) आरोग्यविषयक सुविधांची उपलब्धता व कमतरता यातील भिन्नता तपासणे.

६) आरोग्य केंद्राचे प्रभावक्षेत्र अभ्यासणे.

७) विविध आजारांचा अभ्यास करणे.

८) शासकीय आरोग्य सुविधांचा व योजनांचा अभ्यास करणे.

गृहितकृत्ये :

१) आरोग्य केंद्राची संख्या अपूरी आहे.

२) रायगड जिल्ह्यातील आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांची संख्या मंजूर पदांपेक्षा कमी आहे.

३) आरोग्य केंद्रातील सोयी-सुविधांमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात वाढ झाली नसून अत्याधुनिक सोयी-सुविधाही उपलब्ध नाहीत.

४) आरोग्य केंद्राचे वितरण असमान आहे.

५) तालुक्यातील लोकसंख्या व आरोग्य केंद्राची संख्या यात सहसंबंध नाही.

आकडेवारी संकलन स्त्रोत

या संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरूपाच्या आकडेवारीचा आधार घेतलेला आहे. प्राथमिक स्वरुपाची माहिती शासकीय जिल्हा रूग्णालय, ग्रामीण रूग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र व प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांना भेटी देवून प्रश्नावलीच्या माध्यमातून प्राप्त केलेली आहे. दुय्यम स्वरूपाची माहिती व आकडेवारी जिल्हा परिषदेमधील आरोग्य विभागाचा वार्षिक अहवाल, जिल्हा रूग्णालयातील वार्षिक अहवाल, विविध वर्षाचे सामाजिक व आर्थिक समालोचन, जनगणना पुस्तिका इ.स.१९९१ व २००१, जिल्हा गॅझेटियर, वैद्यकीय भूगोलाचे विविध संदर्भ ग्रंथ, आरोग्याशी संबंधित मासिके, अनेक संशोधन लेख, आरोग्य सेवा संचालनालयाचा अहवाल व इंटरनेटवरील माहितीचा आधार घेतलेला आहे.

अभ्यास पद्धती :

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी मिळवण्यात आलेल्या प्राथमिक व द्वितीयक माहितीचे विश्लेषण विविध तक्ते व आलेखाच्या साह्याने केलेले आहे. हे विश्लेषण करण्यासाठी सांख्यिकी पद्धती वापरलेली आहे. आरोग्य केंद्राचे वितरण दाखवण्यासाठी नकाशाशास्त्रीय पद्धतीचा अवलंब केलेला आहे. कार्ल पिअरसन यांची सहसंबंध पद्धत प्रस्तुत संशोधनात वापरण्यात आली आहे. आरोग्य केंद्र व क्षेत्र, वस्त्या आणि लोकसंख्या यांचा सहसंबंध काढलेला आहे. त्याकरिता खालील सुत्र वापरण्यात आले आहे.

$$r = \frac{\Sigma dxdy}{\sqrt{(\Sigma dx)^2 \times (\Sigma dy)^2}}$$

अभ्यास क्षेत्रातील आरोग्य केंद्राचे वितरण कशा पद्धतीने झालेले आहे हे पाहण्यासाठी निअरेस्ट नेबर पद्धतीचा वापर केलेला आहे. यासाठी खालील सूत्र वापरलेले आहे.

$$RN = \frac{\text{Observed Mean Distance}}{\text{Expected Mean Distance}}$$

$$0.5\sqrt{\frac{A}{N}}$$

खुलासा :

RN = Randomties

A = Total Area

N = Total Number of Medical Centers

आरोग्य केंद्राचे क्षेत्रफळ, वसाहत संख्या व लोकसंख्येनुसार असलेले वितरण अभ्यासण्यासाठी $S.D. = \sqrt{\frac{\Sigma(x-\bar{x})^2}{N}}$

या सुत्राचा वापर केलेला आहे.

आरोग्य केंद्राचे प्रभावक्षेत्र अभ्यासण्यासाठी विविध चार पद्धतींचा वापर प्रस्तुत संशोधनात केलेला आहे. त्यात जॅक्सन यांची सुधारीत पद्धत, व्ही.एल.एस. प्रकाश राव यांची सुधारीत पद्धत, सक्सेना यांची सुधारीत पद्धत आणि अनुभवाधिष्ठित पद्धत यांचा वापर करण्यात आलेला आहे.

I) Jackson's Modified Method

1) $$(\text{Influence area according to area} = \frac{\text{Total Area}}{\text{Total No. of Medical Centre}}$$

2) $$(\text{Influence area according to villages} = \frac{\text{Total Villages}}{\text{Total No. of Medical Centre}}$$

3) $$(\text{Influence area according to population} = \frac{\text{Population}}{\text{Total No. of Medical Centre}}$$

II) V.L.S.Prakash Rao Method

$$D = \frac{T \times A}{U} / R = \frac{T \times A}{U}$$

Modified Method

$$SI = \frac{TC \times A}{U} / R = \frac{\sqrt{TC \times A}}{U}$$

III) सक्सेना यांचे प्रभावक्षेत्राचे सूत्र

$$\text{त्रिज्या} = \frac{(\text{एकूण क्षेत्र}) \times (\text{आरोग्य केंद्राची एकूण लोकसंख्या})}{\text{संपूर्ण अभ्यास क्षेत्राची एकूण लोकसंख्या}}$$

सुधारीत सुत्र $$\text{त्रिज्या} = \sqrt{\frac{(\text{एकूण क्षेत्र}) \times (\text{आरोग्य केंद्राची एकूण लोकसंख्या})}{\text{संपूर्ण अभ्यास क्षेत्राची एकूण लोकसंख्या}}}$$

सदरील संशोधनासाठी एकूण आरोग्य केंद्रांपैकी १० टक्के आरोग्य केंद्रांची नमुना म्हणून निवड करण्यात येईल.

अभ्यासाची मर्यादा

१) सदरील संशोधन करतांना शासकीय आरोग्य केंद्राव्यतिरिक्त इतर सार्वजनिक अथवा खाजगी आरोग्य केंद्राचा विचार केलेला नाही.

२) सदरील संशोधन करताना आजारांचा व त्यावरील उपचार पद्धतीचा अभ्यास केलेला आहे.

३) संबंधित संशोधन हे रायगड जिल्ह्यातील भौगोलिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीला अनुसरून असल्याने या संशोधनाचा इतर जिल्ह्याशी अथवा राज्यांशी तुलना होऊ शकणार नाही व येथील निष्कर्ष हे इतर जिल्ह्यांना लागू होतीलच असे नाही.

४) प्राथमिक माहिती मिळविताना संशोधक यथाशक्तीवर मर्यादा ठेवण्याचा प्रयत्न करेल.

संदर्भ साहित्याचा आढावा :

देवेंद्रकुमार नायक यांनी “Spatial Patterns of Health Care in the Khasi Hills of Meghalaya” या विषयावर शोधनिबंध लिहिला. या शोधनिबंधात त्यांनी मेघालयातील खासी टेकड्यामधील आरोग्य सेवांचे विश्लेषण केलेले आहे. त्यामध्ये १९८१ ते २००१ पर्यंत त्या प्रदेशात झालेली आरोग्य केंद्रातील वाढ, आरोग्य केंद्रात मिळणाऱ्या विविध सुविधा, आरोग्य केंद्र व गावातील अंतर, आरोग्य केंद्राचे स्थान व वितरण यांचे सविस्तर संशोधन केलेले आहे. **भूपेंद्र सिंग** यांनी “A Study of Spatial Variations of Medical Centers in Haryana, India” या शोधनिबंधात हरियाणा राज्यातील १९८१ ते २००१ या वीस वर्षातील आरोग्य केंद्रात झालेल्या बदलाचा अभ्यास केलेला आहे. तसेच लोकसंख्या व खाटांची संख्या याच्या गुणोत्तराचाही अभ्यास केलेला आहे.

माजीद हुसेन यांनी “Medical Geography” हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये वैद्यकीय भूगोलाचा विकास व व्याप्ती, आरोग्य व रोगाची संकल्पना, पर्यावरण व मानवी आरोग्य इ. चे विश्लेषण केलेले आहे. **अहमद हुसेन** यांनी 'Geography of Health' हा ग्रंथ लिहला या ग्रंथामध्ये त्यांनी आरोग्य भूगोलाचा विकास, मूलभुत आरोग्य सुविधा, विविध रोग, कुपोषण व प्राथमिक आरोग्य सेवांचा आढावा घेतलेला आहे.

मेलिंडा एस. मीडे व रॉबर्ट जे. इरीक्सन या दोघांनी मिळून “Medical Geography” हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये त्यांनी वैद्यकीय भूगोलाचा विकास, मानवाच्या आरोग्यावर परिणाम करणारे घटक, विविध रोगाची उत्पत्ती व प्रसार, आरोग्यविषयक सुविधांचा विकास इ. आढावा घेतला आहे. तसेच विविध खंडातील काही महत्त्वाच्या देशामध्ये आरोग्यावर एकूण उत्पन्नाच्या किती टक्के खर्च केला जातो व एक डॉक्टर किती लोकसंख्येला सेवा पुरवितो याचाही आढावा घेतला आहे.

प्रा. विजय बैसाणे यांनी “औरंगाबाद जिल्ह्यातील ग्रामीण आरोग्य सेवा सुविधांचा भौगोलिक अभ्यास” या विषयावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून पीएच.डी. चे संशोधन पूर्ण केलेले आहे. या शोधप्रबंधात त्यांनी औरंगाबाद जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र व ग्रामीण रूग्णालयाच्या माध्यमातून शासनाकडून मिळणाऱ्या आरोग्य सेवा सुविधा व ग्रामीण भागातील लोकांच्या आरोग्यविषयक असलेल्या समस्यांचा अभ्यास केलेला आहे.

प्रकरण मांडणी :

प्रकरण पहिले - संकल्पनात्मक आराखडा

१.१ प्रस्तावना

१.२ वैद्यकीय भूगोलाचा अर्थ

१.३ वैद्यकीय भूगोलाच्या व्याख्या

१.४ वैद्यकीय भूगोलाचा विकास

१.५ आरोग्याची संकल्पना

१.६ आरोग्यावर परिणाम करणारे घटक

१.७ भारतीय वैद्यकशास्त्र

१.८ प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र

१.९ गृहितके

१.१० उद्दिष्ट्ये

१.११ आधार सामुग्रीचे संकलन

१.१२ अभ्यास पद्धती

१.१३ अभ्यासाच्या मर्यादा

१.१४ साहित्याचे पुनरावलोकन

१.१५ प्रकरण मांडणी

प्रकरण दुसरे - अभ्यास क्षेत्रातील भौगोलिक, सामाजिक व आर्थिक घटकांचा आढावा

२.१ प्रस्तावनस

२.२ अभ्यास क्षेत्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी

२.३ स्थान व विस्तार

२.४ भूपृष्ठरचना

२.५ नदीप्रणाली

२.६ हवामान

२.७ मृदा

२.८ वनस्पती

२.९ लोकसंख्या

२.१० वसाहत

२.११ कृषी, पीके व पिकपद्धती

२.१२ जलसिंचन

२.१३ रस्ते वाहतूक

२.१४ उद्योगधंदे

प्रकरण तिसरे- आरोग्य केंद्राचे वितरण

३.१ प्रस्तावना

३.२ तालुकानिहाय क्षेत्रफळ, ग्रामीण वस्त्या, प्राथमिक आरोग्य केंद्र,

३.३ तालुकानिहाय क्षेत्रफळ, ग्रामीण वस्त्या, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र

३.४ तालुकानिहाय क्षेत्रफळ, ग्रामीण वस्त्या व ग्रामीण रुग्णालय

३.५ शहरापासून विविध आरोग्य केंद्राचे निअरेस्ट नेबर रँडम स्केल

३.६ शासकीय धोरणानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र

३.७ शासकीय धोरणानुसार प्राथमिक आरोग्य उपकेंद्र

३.८ शासकीय धोरणानुसार ग्रामीण रुग्णालय

३.९ आरोग्य केंद्रापासून ग्रामीण वसाहतीचे अंतरानुसार तालुकानिहाय वितरण

प्रकरण चौथे - आरोग्य केंद्राची वाढ व विकास

१.१ प्रस्तावना

१.२ तालुकानिहाय लोकसंख्येत झालेली वाढ

१.३ तालुकानिहाय विविध प्रकारच्या सर्व आरोग्य केंद्राच्या लोकसंख्येतील वाढ,

१.४ तालुकानिहाय प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या लोकसंख्येतील वाढ,

१.५ तालुकानिहाय प्राथमिक आरोग्य केंद्राच्या लोकसंख्येतील वाढ

१.६ तालुकानिहाय ग्रामीण रुग्णालयाच्या लोकसंख्येतील वाढ

१.७ तालुकानिहाय आरोग्य केंद्रात झालेली वाढ

१.८ तालुकानिहाय प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात, प्राथमिक आरोग्य केंद्रात व ग्रामीण रुग्णालयात झालेली वाढ

१.९ ग्रामीण रुग्णालय निहाय लोकसंख्येत वाढ

प्रकरण पाचवे - आरोग्य केंद्राचे प्रभावक्षेत्र

५.१ प्रस्तावना

५.२ आरोग्य केंद्राच्या विकासाचा स्तर

५.३ आरोग्य केंद्राच्या प्रभावक्षेत्राचे सैद्धांतिक व अनुभवधिष्ठीत विश्लेषण

५.४ जॅक्सन, व्ही.एल.एस.प्रकाशराव व सक्सेना यांची पध्दत

५.५ प्रभावक्षेत्र

प्रकरण सहावे - आरोग्य केंद्रातील विविध सेवा पदांचा आढावा

६.१ प्रस्तावना

६.२ आरोग्य केंद्रातील पदांचा आकृतीबंध

६.३ आरोग्य केंद्रातील भरलेल्या कर्मचाऱ्यांची पदानुक्रमे सद्यस्थिती

६.४ तालुकानिहाय आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांची सद्य:स्थिती

६.५ आरोग्य केंद्रातील एकूण मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदांचा आढावा

प्रकरण सातवे - विविध प्रकारचे आजार व त्याची कारणे

७.१ प्रस्तावना

७.२ विविध रोगाची संकल्पना

७.३ अतिसार

७.४ अमांश

७.५ विषमज्वर

७.६ क्षयरोग

७.७ हिवताप

७.८ कावीळ

७.९ कुष्ठरोग

७.१० एड्स

प्रकरण आठवे - निष्कर्ष व शिफारशी

१.१ निष्कर्ष

१.२ शिफारशी

१.३ उपाययोजना

संदर्भ सूची

१) सिंघई जी.सी. (२००८) चिकित्सा भूगोल, वसुंधरा प्रकाशन, गोरखपूर

२) डॉ.जगन्नाथ वि. दिक्षीत (अनुवादक) (२००५) सामाजिक आरोग्य परिचर्या, बनारशीदास भनोत पब्लिशर्स, जबलपूर

३) रायगड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन १९८१, १९९१, २००१, २०११

४) रायगड जिल्हा परिषद, आरोग्य विभाग अहवाल, २००५-०६ ते २०१४-१५

५) रायगड जिल्हा गॅझेटिअर

६) महाराष्ट्राचा भूगोल - ए.बी. सवदी

७) असा हा रायगड - एस.एम. देशमुख

८) मराठी विश्वकोश खंड - प्रमुख संपादक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

९) रोड ॲटलास - महाराष्ट्र, समर्थ उद्योग प्रकाशन, औरंगाबाद

१०) कोकण पर्यटन-लोकसत्ता, आयडियल प्रकाशन, मुंबई

11) Majid Husain (1974): Medical Geography Anmol Publications, New Delhi.

12) Geraid F.Pyle (1979): Applied Medical Geography-New York.

13) Akhtar Rais: Diseases Ecology and health.Rawat Publication–Jaipur.

14) Dr.Ahmed Hussain (2007) Geography and Health.Mahaveer Sons,New Delhi.

15) Agnihotri.R.C. (1995): Geomedical Environment and Health Care. Rawat Publication –Jaipur.

16) Primary Health Center(2006) :Manual, Directorate of Health Service, Maharashtra, Mumbai.

17) Statistical methods in geography-Rajasthan Hindi Grantha Academy.

18) Economic survey of Maharashtra 2006 to 2014.

Websites

1. www.Maharashtra state data bank Govt. of Maharashtra.
2. www.india.gov.in
3. http://mahades.maharashtra.gov.in
4. www.raigad.ac.in
5. www.mahaarogya.com
6. www.jsk.gov.in

संशोधक
प्रा.शिंदे अनिल निवृत्ती
डॉ.सी.डी. देशमुख कॉमर्स व
सौ.के.जी.ताम्हाणे कला महाविद्यालय,
रोहा ता.रोहा जि.रायगड

मार्गदर्शक
प्राचार्य डॉ.सदानंद हरिबा गोने
उज्वल ग्रामीण महाविद्यालय,
घोणसी ता.जळकोट जि.लातूर